# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

## उद्दिष्ट :

दारिद्रय रेषेखालील भुमिहीन अनु. जाती व नवबौध्द शेतमजुर कुटूंबाच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे, त्यांच्या राहणीमानात सुधारणा व्हावी व मजुरीवर असलेले त्यांचे अवलंबित्व कमी व्हावे, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते.

## लाभाचे स्वरूप :

१) सदर योजना 100% शासन अनुदानित आहे.

२) अनु. जाती व नवबौध्द घटकाच्या दारिद्रय रेषेखाली भुमिहीन कुटूंबाला 4 एकर कोरडवाहु (जिरायत) जमिन किंवा 2 एकर ओलीताखालील (बागायती) जमिन उपलब्ध करुन देण्यात येते.

## अटी व शर्ती :

१) अर्जदार हा अनुसूचित जाती / नवबौध्द घटकातील असावा.

२) अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील व भुमिहीन शेतमजुर असावा.

३) अर्जदाराची वयोमर्यादा 18 ते 60 वर्षापर्यंत असावी, विधवा आणि परित्यक्ता स्त्रियांना प्राधान्य देण्यात येते व अनुसूचित जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्‌याअंतर्गत अनु. जातीचे अत्याचार ग्रस्त यांना प्राधान्य देण्यात येते.

## संपर्क :

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा